# दोन राक्षस

मायकेल फोरमन



# दोन राक्षस

**मूळ कथा : मायकेल फोरमन**

मराठी अनुवाद : अर्चना कुलकर्णी





खूप वर्षांपूर्वी, एका अतिशय सुंदर देशात दोन राक्षस राहत होते. तिथे उन्हाळ्यात हवामान उबदार असे. थंडीमध्ये जमीन बर्फाने आच्छादलेली असायची आणि ते दृश्य अतिशय मनोहर दिसायचे.

दोन्ही राक्षस रोज डोंगरात आणि जंगलात फिरायला जात. फिरत असताना एखादं झुडूप आपल्या पायाने उखडलं तर जात नाही ना ह्याची ते काळजी घ्यायचे. चिमण्यांनी तर त्या राक्षसांच्या दाढीत घरटी बांधली होती. राक्षस जिथे कुठे जातील तिकडे पक्षी मंजुळ गाणी गात.




एक दिवस बोटीतुन फिरत असताना दोघांना एक गुलाबी रंगाचा शिंपला दिसला. तो शिंपला खूपच चमकदार होता आणि दोन्ही राक्षसांना तो खूप आवडला.



“मी हा शिंपला माळेसारखा गळ्यात घातला तर किती छान दिसेल ना,” त्यातील बोरिस नावाचा राक्षस म्हणाला.


“मुळीच नाही, हा मी माझ्या गळ्यात माळेसारखा घालणार” दुसरा सॅम हा राक्षस म्हणाला. “माझ्या गळ्यात तो जास्त सुंदर दिसेल.”



आत्तापर्यंतच्या आयुष्यात प्रथमच ते दोघे आपापसात वाद घालू लागले. जेंव्हा ते एकमेकांवर ओरडायला लागले तेंव्हा सूर्य ढगाआड लपला आणि ढगांचा रंग गडद होऊ लागला.



घों-घों आवाज करत वारा जोरात वाहु लागला. आकाशात ढग आणि समुद्रात लाटा उसळू लागल्या . थोड्यावेळाने जोरात पाऊस कोसळायला लागला. त्या दोघांचं भांडण जितकं वाढत गेलं तितका गारठा वाढत गेला . हळूहळू समुद्राच्या लाटा उंच उंच होत समुद्र किनाऱ्याला गिळू लागल्या.



बोरिस आणि सॅमने घाईघाईने आपले मोजे घातले. त्यानंतर ते बूट घालतच होते तेवढ्यात एक मोठ्ठी लाट आली आणि संपूर्ण किनारा पाण्याखाली बुडला.



त्या मोठ्या लाटेने राक्षसांचे बूट आणि तो सुंदर गुलाबी शिंपला पण वाहून नेला.

ते पाहून दोन्ही राक्षसांना खूप राग आला आणि ते दोघे एकमेकांवर दगडं फेकू लागले. ते समुद्राच्या पुरापासून वाचण्यासाठी डोंगराच्या दिशेने धावायला लागले .



लवकरच ते दोन डोंगर सोडून संपूर्ण  देश पाण्याखाली बुडून गेला. आता त्या संपूर्ण थंडगार समुद्रामधे त्या दोन डोंगरांची शिखरंच बेटासारखी वाचली होती.  त्यातील एका बेटावर बोरिस रहात होता आणि दुसर्‍या बेटावर सॅम.

तिकडे थंडी होती. खरंतर त्या दोघांना बर्फ खूप आवडायचा. पण आता बर्फ पडणं बंद झालं होतं. हिवाळ्यानंतर परत हिवाळा हाच ऋतू यायला लागला. उन्हाळ्यातले सुंदर हवामान ते विसरूनच गेले होते. आता  तिकडे प्रत्येक दिवस आधीच्या दिवसा सारखा थंडगार आणि उदास असायचा.

दोन्ही राक्षस एकमेकांचा खूप राग राग  करत. आधी ते एकमेकांना लहान लहान खडे मारायचे, आता त्यांनी मोठे मोठे दगड मारायला सुरुवात केली होती.







सोमवारी सॅम बोरिसवर मोठा दगड फेकत असे, मंगळवारी बोरिस सॅमवर दगड फेकत असे, बुधवारी परत दगड फेकायची सॅमची पाळी असे. असंच आठवड्या मागून आठवडे चालत राहिलं.

हो.. पण रविवारी मात्र शांतता असायची. जेंव्हा दोन्ही राक्षसांचे नाक, कान, तोंड, डोकं दगडांच्या माऱ्याने जखमी झाले तेंव्हा मात्र त्यांचा राग अनावर झाला.



संपूर्ण समुद्रात राक्षसांनी फेकलेल्या दगडांची एक रांगच तयार झाली.एक दिवस सॅम ने त्या दगडांवर उडी मारून जायचा विचार केला,त्याने बोरिसच्या झोपण्याची वाट पाहत पाहिली आणि नंतर आपली दगडाची गदा घेऊन दगडांवरून उड्या मारत तो बोरिस असलेला डोंगर चढू लागला.



सॅम, डोंगरावर चढून आपल्या गदेने झोपलेल्या बोरिसला मारणार होता जेणेकरून तो झोपून राहील आणि आपल्याला दगडं मारणार नाही.





सॅमने समुद्रात पहिल्या दगडावर उडी मारली मग दुसऱ्या दगडावर उडी मारली. सॅमने तिसऱ्या दगडावर उडी मारलीच होती की बोरिसने डोळे उघडले. बोरिसने सॅमला आपल्याकडे गदा घेऊन येताना पाहिले. लगेच बोरिसने पण आपली गदा उचलली आणि दगडांवरून उड्या मारत तो सॅम कडे झेपावला. जसजसे दोन्ही भिमकाय राक्षस दगडांवर उड्या मारू लागले संपूर्ण धरती हलू आणि थरथरू लागली.





अचानक दोन्ही राक्षस थांबले. सॅमने बोरिसच्या पायांकडे पाहिले आणि बोरिसने सॅमच्या पायाकडे पाहिले.



दोन्ही राक्षसांच्या पायांमधे एक काळापांढरा आणि दुसरा तांबडानिळा मोजा होता. दोघेही एकमेकांकडे रोखून बघत होते.



हळूहळू त्यांना तो दिवस आठवला ज्या दिवशी संपूर्ण देश समुद्राच्या पाण्याखाली गेला होता आणि पुराच्या पाण्यापासून वाचण्याच्या घाईमधे त्याच्या मोज्यांची  अदलाबदल झाली होती. आता तर ते त्यांच्या भांडणाचं कारण सुद्धा विसरले होते.त्यांना आता फक्त एव्हढेच आठवत होते की ते लहानपणापासून चे मित्र आहेत. त्यांनी त्यांच्या गदा समुद्रात फेकून दिल्या आणि ते आनंदाने गायला, नाचायला लागले. ते जेंव्हा आपल्या बेटावर परत आले तेंव्हा त्यांना एक पांढर फूल दिसलं आणि त्यांच्या खांद्यावर सूर्याच्या किरणांची ऊब जाणवली.







हळूहळू समुद्रातील पुराचं पाणी ओसरू लागलं, जिथे
पाणी होतं तिथे फ़ुलं फुलु लागली, पक्षीसुद्धा बेटावर परत आले.

काही दिवसांनी दोन्ही डोंगरांच्या दरीमधे हिरवीगार झाडं उगवली. आता तो देश अजूनच मोठा आणि सुंदर दिसू लागला. सॅम आणि बोरिस रोज त्या फुलांच्या ताटव्यामधे बसायचे,कधीकधी नाकतोडा त्यांच्या मांडीवर बसायचा.



कधीकधी एखादं फुलपाखरू सॅमच्या कानात किंवा बोरिसच्या नाकात घुसायचं. त्याच्या डोक्यावर पक्षी येऊन बसायचे. दोघेही राक्षस आता खुश होते आणि सर्व ऋतूंची मजा अनुभवत होते.



कधी कधी ते दोघे आपल्या देशात फेरफटका मारायचे, घनदाट जंगलात, गवतात,बर्फात फिरायचे. कधी ते समुद्र किना-यावरच्या वाळूत आपल्या पायांचे ठसे उमटवायचे . पण जास्त वेळ ते घनदाट जंगलात पक्षी आणि फुलांच्यामध्येच घालवायचे.







काहीही झालं तरी ते आपल्या दोन पायात वेगवेगळे मोजेच  घालायचे. एकाने नवीन मोजे घेतले तरी त्यातला एक हमखास दुस-याला द्यायचे.



समजा भांडणाला काही कारण घडलंच तर ..
असा त्यामागे विचार होता..!



